**संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर यांचे कार्यालय**
मूलरोड, चंद्रपूर-442401 (महाराष्ट्र राज्य) फॅक्सनं. 07172-270405
**दुरध्वनीक्रमांक : 07172-255519 E-mail:** principalcfrc@gmail.com

==========================================================================

विषय:- चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर (ता.जि. चंद्रपूर) संकुल निर्मितीचे विस्ताराकरीता 0.85 हेक्टर क्षेत्राचे वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्तावाकरीता आवश्यक असलेले दस्तावेज मिळणेबाबत.

क्रमांक :- कक्ष-2/लेखा/चंवनप्रबो./ 329
चंद्रपूर दिनांक:- 31/05/2019

प्रति,

मा. सरपंच / सचिव
ग्रामपंचायत कार्यालय,
लोहारा जि. चंद्रपूर

उपरोक्त् विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर संकुल निर्मितीचे काम प्रगती पथावर असुन सदर वन प्रबोधिनीस आवश्यक विद्युत पूरवठा होण्याकरीता 33/11 KV Electrical Sub Station उभारणे प्रस्तावित आहे. त्याकरीता चंद्रपूर तालुक्यातील कम्पार्टमेंट नंबर 403 मधील 0.85 हेक्टर क्षेत्राचे वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्तावाकरीता आवश्यक असलेले FRA Certificate प्रकरणी ग्राम सभेचे / वन समितीचा ठराव व वनसमितीचा कार्यवाही अहवाल संबंधिचे 1) प्रस्तावित वनजमीन संबंधाने आयोजित करण्यात येणा-या ग्राम सभेच्या ठरावामध्ये एकुण सदस्य् संख्या किती आहे. एकुण संदस्य् संख्यापैकी किती सदस्य् संख्या उपस्थित होती. 2) ग्राम सभेमध्ये एकुण सदस्य् संख्या उपस्थिती 50% पेक्षा जास्त होती हे दर्शविणारे पत्र. 3) ग्राम सभेच्या सदस्यांची उपस्थिती दर्शविणारे स्वाक्षरीसह यादीची प्रमाणित प्रत 4) कम्पार्टमेंट नंबर 403 मधील 0.85 हेक्टर वनजमीनीबाबत ग्राम सभेचा ठराव व अहवाल अत्यावश्यक आहे.

तरी ग्राम सभा / वन समितीची सभा आयोजित करून वरील प्रमाणे दस्ताऐवज या कार्यालयास पुरविण्यात यावे विनंती आहे.

Akhade
संचालक
चंद्रपूर वन प्रशासन, विकास व
व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर

प्रतिलिपी:- वनपरिक्षेत्र अधिकारी, चंद्रपूर वन प्रबोधिनी, चंद्रपूर यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस रवाना. त्यांनी वरीलप्रमाणे कार्यालयाशी संपर्क साधुन नमुद दस्तावेज त्वरीत प्राप्त् करून कार्यपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

D/OfficefileBCM/33KV33KV Substation